राज्य योजना सन २०१८-१९
वन्यप्राणी अपंगालयाची स्थापना करणे (२४०६- २२३२) करीता निधी वितरीत करणे.

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग,**
**शासन निर्णय क्र. डब्ल्यूएलपी-०५.१८/प्र.क्र.२००/फ-१**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २२ मार्च, २०१९.

**वाचा :-**

१. वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक :- अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक ०२.०४.२०१८.
२. शासन निर्णय क्र. डब्ल्यूएलपी-०५१८/प्र क्र २००/फ-१, दिनांक :- ०८.०५.२०१८.
३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्रमांक कक्ष-१/पी/यो/चाबाप्र/प्र.क्र.३०/(२०७-२०१८)/७१८, दिनांक २३.०७.२०१८.
४. वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक :- अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक २५.०१.२०१९.
५. शासन निर्णय क्र. डब्ल्यूएलपी-०५१८/प्र क्र २००/फ-१, दिनांक :- ०१.०२.२०१९.
६. वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक :- अर्थसं-२०१९/प्र.क्र.४२/अर्थ-३, दिनांक ०८.०३.२०१९.
७. शासन पत्र, महसूल व वन विभाग, पत्र क्रमांक :- बीयूडी-२०१९/२४०६/प्र.क्र. १९/ब-१, दिनांक ११.०३.२०१९.
८. शासन निर्णय क्र. डब्ल्यूएलपी-०५१८/प्र क्र ४००/फ-१, दिनांक :- १६.०३.२०१९.
९. शासन निर्णय क्र. डब्ल्यूएलपी-०५१८/प्र क्र ४००/फ-१, दिनांक :- २०.०३.२०१९.

**प्रस्तावना :-**

सन २०१८-१९ राज्यस्तरीय योजनेअंतर्गत वन्यप्राणी अपंगालयाची स्थापना करणे (२४०६- २२३२) या लेखाशिर्षांतर्गत संदर्भ क्रमांक २,५, ८ व ९ च्या शासन निर्णयान्वये आतापर्यत रु. ४०४.२४ लक्ष निधी वितरित करण्यात आला आहे.

आता संदर्भ क्रमांक ७ च्या शासन पत्रान्वये सन २०१८-२०१९ चा आठमाही सुधारीत अदाज जारी करण्यात आला असून त्यात वन्यप्राणी अपंगालयाची स्थापना करणे (२४०६- २२३२) या लेखाशिर्षांतर्गत रु. ४७९.१० लक्ष निधी दर्शविण्यात आला असून वित्त विभागाच्या संदर्भ क्र. ६ च्या परिपत्रकानुसार आठमाही सुधारीत अदाजाच्या मर्यादेत निधी वितरीत करण्याचे निर्देश देण्यात आले आहे.

सबब वन्यप्राणी अपंगालयाची स्थापना करणे (२४०६- २२३२) या लेखाशिर्षांतर्गत रु. ७४.८६ लक्ष निधी वितरणासाठी शिल्लक आहे.

**शासन निर्णय :-**

सदर शासन निर्णयान्वये अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी संदर्भ क्रमांक ३ च्या पत्रान्वये वन्यप्राणी अपंगालयाची स्थापना करणे (२४०६- २२३२) या योजनेंतर्गत सादर केलेल्या प्रस्तावास अनुसरून खालील अटींच्या अधीन राहून **रुपये ३१.५८ लक्ष निधी** सोबत जोडलेल्या तक्त्यानुसार खर्च करण्यास शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

१. सदर योजनेवर होणारा खर्च सन २०१८-१९ मध्ये लेखा शिर्ष क्रमांक २४०६ वनीकरण व वन्यजीवन, ०२ पर्यावरणीय वनीकरण व वन्यजीवन, ११० वन्यजीव, पंचवार्षिक योजनाअंतर्गत, राज्य योजनांतर्गत योजना (००) (१०) वन्यप्राणी अपंगालयाची स्थापना (२४०६-२२३२) अंतर्गत उद्दिष्टनिहाय, अर्थसंकल्प वितरण प्रणालीव्दारे प्राप्त होणाऱ्या निधीतून करण्यात यावा.
२. योजनांतर्गत प्रस्तावीत कार्यबाबींना आवश्यकतेनुसार सक्षम प्राधिकाऱ्यांनी प्रशासकीय व तांत्रिक मान्यता प्रदान केलेली आहे याची खातरजमा झाल्यानंतरच सदर कार्यबाबींवर निधी खर्ची टाकण्यात यावा.

३. सदर कामे करताना भारतीय वन अधिनियम, १९२७, वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ व वन ( संवर्धन ) अधिनियम १९८० तसेच राष्ट्रीय प्राणी संग्रहायलयाच्या मार्गदर्शक तत्वांचा भंग होणार नाही व आवश्यक ती परवानगी घेतली गेली आहे ह्याची दक्षता घ्यावी.

४. प्रस्तावात नमूद ज्या कामांना सक्षम प्राधिकाऱ्यांची प्रशासकीय मंजूरी मिळाली आहे त्यावरच वितरीत अनुदान खर्च होईल याची खातरजमा करण्यात यावी.

५. वितरीत केलेला निधी शासनाने दिलेल्या मान्यतेनुसार योजनेस विहीत केलेल्या मर्यादेत, प्रचलित नियमांच्या अधीन राहून, प्रचलित धोरण व वित्त विभागाने वेळोवेळी विहीत केलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार तसेच प्रस्तावात नमूद केलेल्या कार्यबाबींच्या अनुषंगाने खर्च करण्यात यावा.

६. प्रस्तावित असलेल्या बांधकामासाठी शासनाने दिलेल्या सूचना आणि विहीत केलेली कार्यपद्धती अनुसरण्याची संबंधीत नियंत्रक/अंमलबजावणी अधिकारी यांची राहील. कोणत्याही प्रकारची वित्तीय अनियमितता होऊ न देण्याचीही जबाबदारी त्यांची असेल.

७. कार्यबाबींमध्ये खरेदीचा समावेश असल्यास शासनाने विहित केलेल्या पध्दतीचा अवलंब करुन खरेदी करण्यात यावी.

८. वित्त विभागाने निर्गमित केलेल्या विविध मार्गदर्शन सूचनांचे व वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक - विअप्र-२०१३/प्र.क्र. ३०/२०१३/विनियम, भाग-२ ,दिनांक - १७.०४.२०१५, वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक - अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक ०२.४.२०१८, वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक :- अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक २५.०१.२०१९ च्या परिपत्रकाचे काटेकोर पालन करावे .

२. सदर शासन निर्णय वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक :- अर्थसं-२०१९/प्र.क्र.४२/अर्थ-३, दि. ०८.०३.२०१९.ला अनुलक्षून निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३२२१७४१२९८६१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Swapnil Deshbhratar

Digitally signed by Swapnil Deshbhratar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9add558653210cf44615291102f1bf143783e8403be64c06c7928e692d77c386, cn=Swapnil Deshbhratar
Date: 2019.03.22 17:50:38 +05'30'

**(स्वप्निल देशभ्रतार)**
विशेष कार्य अधिकारी
**महसूल व वन विभाग**

**प्रत,**

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पूर्व नागपूर.
५. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पश्चिम, मुंबई.
६. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती.
७. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), अमरावती.
८. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), यवतमाळ.
९. वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, सह्याद्री व्याघ्र प्रकल्प, कोल्हापूर.
१०. महालेखापाल१/२ (लेखा व अनुज्ञेयता)/ (लेखापरिक्षण), मुंबई/नागपूर.
११. फ-१ कार्यासन (निवडनस्ती), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

*******

**शासन निर्णय क्रमाक :- डब्ल्यूएलपी-०५.१८/प्र.क्र.२००/फ-१, दिनांक :- २२.०३.२०१९ सोबतचे विवरण पत्र.**

| अ.क्र. | वनवृत्त /विभागाचे नाव | एकूण रक्कम ( रु.लाखात) |
|---|---|---|
| १ | मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), अमरावती. | ४.५२ |
| २ | मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), यवतमाळ | ७.१० |
| ३ | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती. | ०.४६ |
| ४ | वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, सह्याद्री व्याघ्र प्रकल्प, कोल्हापूर. | १९.५० |
| | **एकूण** | **३१.५८** |